# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/02/2024 (बुधवार) सकाळ


## NDPS Act मधील मुख्य आरोपी व त्याचा साथीदारास स्थानिक गुन्हे शाखेकडुन अटक

मा. पोलिस अधीक्षक साहेब, नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात दिनांक ११/०१/२०२४ रोजी गोपनीय माहितीचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलिस ठाणे बटुटीबोरी हद्दीत गुंगिकारक वनस्पती गांजाचे वाहतूक करणारे कंटेनर क्र. ताब्यात घेवून त्या मधून एकूण ४९५ किलो गांजा जप्त करून मिळून आलेले चालक व कंडक्टर विरूद्ध पोलिस ठाणे बट्टीबोरी येथे अप. क्र. १५/२४ कलम २०,२२ NDPS Act अन्वये गुन्हा नोंदविलेला होता. आज पावेतो नागपुर ग्रामीण परिसरातील अश्या प्रकारचे गुन्ह्या मध्ये मुख्य आरोपी अटक न झाले बाबत मा. पोलिस अधीक्षक साहेब श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे निदर्शनास आले वरून त्यांचे आदेशान्वये सदर गुन्ह्याचा तपास पोलीस ठाणे बुट्टीबोरी कडून स्थानिक गुन्हे शाखे कडे वर्ग करण्यात आला. पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दिनांक १३/०१/२०२४ पासून सदर गुन्ह्याचा तपास सुरु केला. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी बाबत कोणताही सुगावा नसताना पथकाने खाजगी वाहनाने राजस्थान, दिल्ली, हरियाणा राज्यात जावून अत्यंत गुप्त पद्धतीने माहिती प्राप्त करून उत्तर प्रदेश वाराणसी येथे सतत ७ दिवस सापळा रचुन कसोशीने प्रयत्न करून सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे – आलोक रामविलास सिंग, वय ३५ वर्ष, रा. बजरंग विहार कॉलनी, taktakpur वाराणसी यास ताब्यात घेतले. आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले वरुन मा. न्यायालयातून आरोपीचा दिनांक ०५/०२/२०२४ पर्यंत PCR घेण्यात आला. सदर मुख्य आरोपीचे सांगणे प्रमाणे सदर गुन्ह्यांतील गांजा त्यास विकणारा मुख्य आरोपीचे शोध कामी PCR मधील आरोपी सह पथकाने राज्य ओडिशा येथे जावून नक्षल प्रभावित क्षेत्र पोलिस ठाणे सेमिलिगुडा येथे सुद्धा २ दिवस सापळा रचुन जिवाची परवा न करता मुख्य आरोपी नामे भिमसेन उर्फ रूपा नंदा पांगी, वय ३२ वर्ष, रा. कुसुमा, जी. कोरापुट, ओडिशा यास ताब्यात घेवून अटक केली आहे. नमूद दोनही आरोपितांनी सदर चा गुन्हा केल्याचे मान्य केले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आशिष मारेखेडे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मारेखेडे, पोहवा मिलींद नांदुरकर, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे, यांनी पार पाडली.

## कापूस चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा मांढळ येथे दिनांक ०६/०२/२०२४ चे १२.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– रनधीर तुळशीराम शेंडे, वय ५४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२ यांची दीड एकर शेती मौजा मांढळ शिवारात असुन ती शेती फिर्यादी स्वत: वाहतो. फिर्यादीने शेतात कापसाची लागवड केली होती. व तो कापुस काढुन त्याचे घराचे समोरील छप्परीत नॉंयलॉंनचे चुंगड्यांमध्ये कापुस भरुन ढीग मारुन ठेवला होता. दिनांक ०६/०२/२०२४ रोजी दुपारी ०२/३० वा. सुमारास फिर्यादीच्या घराचे बाजुला सख्खा भाऊ बंडु शेंडे याचे घर असुन त्याचे घरी पाहुणे म्हणुन भासे जवाई आले असल्याने फिर्यादी त्यांना भेटण्याकरीता भाऊ बंडु याचे घरी गेले होते. तेव्हा मोहल्ल्यातील लोकांनी तेथे येवुन सांगीतले की, तुमचे घराचे छपरीत कापुस भरुन ठेवलेल्या कापसाचे चुंगडीचे ढीगाऱ्यातुन एक कापसाची भरलेली चुंगडी **आरोपी नामे– शैलेश अनिल गजभिये, वय ३३ वर्ष, रा. रेल्वे स्टेशन हनुमान नगर भांडेवाडी पारडी बगडगंज नागपूर** हा चोरुन घेवुन जातांना दिसला. असे सांगितल्याने फिर्यादीने आपले घरी जावुन पाहीले असता घराचे छपरीत कापुस भरुन ठेवलेल्या एक कापसाने भरलेली चुंगडी ज्यामध्ये अंदाजे ४० किलो कापुस किंमती अंदाजे ४०००/–रु. चा मुद्देमाल दिसुन आला नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर घटनास्थळी नापोशि रोशन नारनवरे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास नापोशि रोशन नारनवरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर